ZILLA PARISHAD
Inward No. लेखा/कोष
2 8 DEC 1993
Dy.C.E.O. C.E.O.

जिल्हा परिषदा व पंचायत समित्याकडील,
कार/जीप्स वरील वार्षिक दुरुस्ती खर्चामधून
टायर टयूब व बॅटरी या खर्च वगळण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
ग्राम विकास व जल संधारण विभाग
शासन परिपत्रक क्र. जेईपी १०९०/सीआर ४०७३/२६,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२, दिनांक १७ डिसेंबर, ९३.

वाचा :- शासन निर्णय ग्राम विकास विभाग क्र. जेईपी १०८९/सीआर ३५८३/२६,
दिनांक ४ जून, १९९०.

## परिपत्रक

शासनाच्या खर्चामध्ये काटकसरीची उपाययोजना म्हणून संदर्भांकित शासन निर्णयानुसार शासकीय कामाच्या वापरासाठी मुख्य/उप मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद इतर अधिकारी जिल्हा परिषद व सर्व विषय समित्यांचे पदाधिकारी अध्यक्ष सभापती जिल्हा परिषद पंचायत समित्या यांच्या अधिनस्त असलेल्या वाहनावरील वार्षिक दुरुस्ती खर्चाची मर्यादा पेट्रोल वाहनासाठी रुपये १२५००/- व डिझेल वाहनासाठी रुपये १४५००/- दिनांक १ एप्रिल, १९८९ पासून अमलात आणण्यात आलेली आहे. सदर वार्षिक दुरुस्ती खर्चामध्ये टायर टयूब व बॅटरीच्या खर्चाचा समावेश आहे. सर्वसाधारणपणे वाहनाची ४०००० हजार कि. मी. एवढी धावसंख्या झाल्यानंतर वाहनाचे टायर टयूब बदलण्याची आवश्यकता भासल्यास सक्षम यांत्रिकी प्राधिकाऱ्याचे प्रमाणपत्र घेऊन बदलावयाचे असतात. यासाठी महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता १९६८ मधील विहित पध्दतीचे अनुपालन करावयाचे असते. तसेच टायर टयूब बदलल्यामुळे त्यावर्षी सदर वाहनाच्या दुरुस्तीसाठी असलेली वार्षिक व विहित मर्यादा ओलांडली जाणार नाही याची जिल्हा परिषदेने पंचायत समितीने दक्षता घ्यावयाची असते परंतु सध्याच्या टायर टयूब बॅटरी यांचे भाव वाढल्यामुळे वाहनावरील दुरुस्तीच्या विहित मर्यादेत खर्च करणे शक्य होत नाही त्यावर्षी सदर वाहनावरील दुरुस्ती खर्चात मोठ्या प्रमाणात वाढ होते त्यामुळे टायर टयूब व बॅटरीवरील खर्च दुरुस्तीच्या विहित मर्यादेमधून वगळण्याबाबत काही जिल्हा परिषदांनी प्रस्ताव मंजूरीसाठी शासनाकडे पाठविले होते परंतु शासनाने याबाबत सर्वकष विचार करुन सदर विनंती अमान्य केलेली आहे.

२ वाहनाच्या टायर टयूबवरील खर्चासह एकूण वार्षिक देखभाल व दुरुस्ती खर्चावर मर्यादा असणे आवश्यक आहे साधारण ३ वर्षांनंतर टायर टयूब बदलणे आवश्यक ठरत असल्यामुळे त्यावरील खर्च सरासरीनुसार प्रत्येक वर्षाच्या देखभाल दुरुस्ती खर्चामध्ये समाविष्ट करावा मात्र एकाच वर्षी विहित मर्यादेपेक्षा जास्त खर्च त्यावरती होणार नाही हे पहावे.

याच संदर्भात वाहनात वारंवार बिघाड होऊ नये म्हणून सर्व जिल्हा परिषदांनी व पंचायत समित्यांनी वाहनासंबंधी पुढील मार्गदर्शक तत्वांचे पालन करण्याबाबत शासनाने आदेश दिलेले आहेत.

ZILLA PARISHAD ... DURG

Scanned by CamScanner

वाहन चालक शक्यतो एकच असावा म्हणजे वाहन एक हाती असावे

१] वाहन चालकास मेंटेनन्स विषयक ज्ञान असावे त्यादृष्टीने त्यास

२] प्रशिक्षण देणे उपयुक्त राहील.

३] वाहन चालक प्रामाणिक व सचोटीने वागणारा असावा.

४] वाहनाचे मेंटेनन्स वेळेवर व्हावे या दृष्टीने मेंटेनन्स शेड्यूलची माहिती वाहन चालकास असावी व तिचे काटेकोरपणे पालन व्हावे.

५] वाहनाच्या अधिकाऱ्यास वाहनाच्या इंधन तेल यांच्या सरासरी खर्चाविषयी ज्ञान अवगत असावे.

६] वाहनाच्या तक्रारी उदभवल्या तर जवळपासच्या यांत्रिकी कर्मशाळेची मदत घेऊन/सल्ला घेऊन वेळेवर दुरुस्ती व्हावी.

७] परीरक्षा व दुरुस्तीची कामे वेळीच करण्यात यावीत.

८] वाहने चालवताना सुरक्षीत व किफायतशीर अशी वेगमर्यादा पाळणे आवश्यक आहे.

९] वाहनाच्या टायर्सची निगा उदा. वेळोवेळी अचूक दाबाची हवा भरणे याकडे जातीने लक्ष देणे आवश्यक आहे.

१०] वाहनाची नोंदवही/हिस्टरी शीट अद्यावत ठेऊन अधूनमधून जबाबदार व्यक्तीने ती तपासावयास हवीत.

११] वाहनाच्या निर्मीती कारखानदाराने दिलेल्या देखभाल विषयक सूचनांचे पालन करावे.

३ सर्व जिल्हा परिषद व पंचायत समित्यांना विनंती करण्यात येते की, त्यांनी आपल्या प्रशासकीय नियंत्रणाखालील सर्व कार्यालयांना वाहनाची जोपासना वरील मार्गदर्शक तत्वानुसार करण्यासंबंधीचे आदेश तात्काळ द्यावेत व या आदेशाचे काटेकोरपणे अनुपालन होत आहे याबाबत दक्षता घ्यावी.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

[ सुरेश कुमार ]
सचिव
ग्राम विकास व जल संधारण विभाग

प्रति,

१] विभागीय आयुक्त [सर्व]
२] मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद [सर्व]
३] मुख्य लेखा परीक्षक स्थानिक निधी लेखा मुंबई,
४] उपमुख्य लेखा परीक्षक स्थानिक निधी लेखा [सर्व]
५] मुख्य लेखा व वित्त अधिकारी जिल्हा परिषद [सर्व]
६] गट विकास अधिकारी पंचायत समितीमार्फत जिल्हा परिषद
७] जिल्हा परिषद सर्व पदाधिकारी [मार्फत मुख्य कार्यकारी अधिकारी]

Scanned by CamScanner